आं.२/०१५

जा. क्र. ४०६६/२०२५
जिल्हा न्यायालय अभिलेख कक्ष बीड.
दिनांक. १९/०३/२०२५

प्रति,

| | |
|---|---|
| १ | खान टेडर्स, बेस्ट पेपर मार्ट गव्हर्नमेंट मिल्स सप्लायर्स लेबर कॉलनी, लातूर |
| २ | केसरोददीन शेख दाउद घर नंबर १/१७/३२ मोमिनपुरा औरंगाबाद |
| ३ | मॅनेजर, महाराष्ट्र हॅन्ड पेपर मॅनिफक्चरर अॅण्ड डाय पेपर पल्प सप्लायर्स सेंटर, कागजीपुरा, ता.खुलताबाद जि.औरगांबाद |
| ४ | जिजोयोद्रदीन फेज बक्ष पन्नीपुरा दौलताबाद, ता.जि.औरंगाबाद |
| ५ | आनंद ट्रेडर्स मु.पो. कागजीपुरा ता.खुलताबाद जि.औरंगाबाद |
| ६ | महंमद मुसा कागजी मु.पो.कागजीपुरा ता.खुलताबाद जि.औरंगाबाद |
| ७ | व्यवस्थापक मुद्रणालय विभाग येरवडा जेल पुणे |
| ८ | एम अतिक, ए.ए. स्क्रॅप मर्चंट, अजिजपुरा बीड |
| ९ | ए.एम. स्क्रॅप मर्चंट, बार्शी रोड विदयानगर बीड |
| १० | कोशिश सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मार्यादित बीड |
| ११ | न्यू आदर्श स्क्रॅप बीड, काझी नगर बालेपीर नगर रोड राणी किराणा जवळ, बीड |

विषयः– जिल्हा न्यायालय बीड येथील रद्दी (टाकाऊ कागद) खरेदी करिता निवीदा पाठविणेबाबत.

वरिल विषयी आपणास कळविण्यात येते की, बीड जिल्हा व सत्र न्यायालय बीड व सर्व तालुका न्यायालयासह अभिलेख कक्षातील नाश केलेले रद्दी (टाकाऊ कागद) व न्यायालयाच्या पुस्तकांचे निर्लेखन केल्यामुळे ग्रथालय विभागातील रद्दी विकी करणे आहे.

तरी आपणास रद्दी खरेदी करणे असल्यास आपण सदरची रद्दी कोणत्या किंमतीने खरेदी करणार आहात याची बंद लिफाफयात निविदा मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधिश बीड यांचे नावे जिल्हा न्यायालय,

बीड येथे दिनांक 01/04/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

निविदा दिनांक. 05/04/2025 रोजी सायंकाळी 05.30 वाजता उघडल्या जातील. निविदासोबत आपण सरकार मान्य रद्दी खरेदीदार असल्याबाबतचा कागदी पुरावा दाखल करावा.

रद्दी विकीस योग्य किंमत न आल्यास निविदा नाकारण्याचा हक्क राखुन ठेवण्यात आलेला आहे.

आदेशावरुन

19/3/2025

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय बीड.

दि. 19/03/2025
बीड

सोबत :— जाहिर प्रगटन
रद्दी खरेदी दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

## जिल्हा न्यायालय अभिलेख विभाग, बीड.
## जाहिरप्रगटन

**रददी खरेदी दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागु राहतील.**

१. प्रत्येक निविदाकारास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
२. या कार्यालयाच्या फायदयाच्या दृष्टीने सर्वात जास्त किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येईल

३. रददी खरेदीवर निविदाकाराला अधिकृत खरेदीदार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर असणे आवश्यक आहे.

४. निविदाकाराला दरपत्रका सोबत निविदाकाराचे पॅनकार्डची छायांकित प्रत देणे बंधनकारक राहील.

५. दरपत्राकामध्ये सर्व प्रकारच्या जार्जेसचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

६. सदर रददी कार्यालयातुन वाहतुक करणे करीता कार्यालया मार्फत वाहन भाडे, हमाली व इतर खर्च देण्यात येनार नाही. तसेच तालुका न्यायालयातील रददीही त्यांनी स्वखर्चाने उचलावी लागेल, त्यासाठीही खर्च देण्यात येणार नाही.

७. कार्यालयात गठीत समिती समोर रददी मोजण्यात येईल.

८. दरपत्रक सादर करणा—या निविदाकारांचा या कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा याची नोंद घ्यावी.

९. दरपत्रक सादर करतांना त्यामध्ये संदर्भाचा उल्लेख करणे बंधनकारक आहे.

१०. रददी न्यायालयाच्या आवाराबाहेर नेल्यानंतर त्यांच्या विल्हेवाटी संदर्भात सर्व जबाबदारी संबंधित रददी खरेदीदाराची राहील.

११. मोहरबंद दरपत्रके ही जिल्हा न्यायालय, बीड गठीत केलेल्या समिती यांचे समक्ष **दि. 05 / 8 /२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा न्यायाधीश—४ बीड यांचे निजी कक्षात उघडण्यात येतील. जर तांत्रीक अडचण निर्माण झाल्यास दुस—या दिवशी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

१२. निविदा/दरपत्रक **दिनांक** 9 / 8 /२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत

सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील प्राप्त निविदा/दरपत्रक **दिनांक ५ / ४ / २०२५** रोजी गठीत समिती समोर उघडण्यात येतील. यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहु शकतो. प्रशासकीय व कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाहीतर लगतच्या दिनांकास अथवा कार्यालयाच्या सोयीनुसार ठरवुन दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.

१३. सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा संपुर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, बीड राखुन ठेवत आहेत.

१४. दिलेल्या मुदतील आपले दरपत्रक या कार्यालयास सादर न झाल्यास वरील संपुर्ण अटी आपणास मान्य नाहीत असे समजण्यात येईल.

१५. सदर दर पत्रक मंजुर झालेल्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधी करीता वैध राहील.

१६. जिल्हा मध्यवर्ती अभिलेख कक्षात जमा झालेली रददी ही दरमहा घेवुन जाणे संबंधीत ठेकेदारास बंधनकारक राहील.

तरी संबंधीत ठेकेदारांना सुचित करण्यात येते की, सदर रददी खरेदी करण्याकरीता आपली सिलबंद निविदाचे पॉकेटवर **"रद्दी खरेदी बाबत निविदा"** असे स्पष्टपणे नमुद करावे व दरपत्रक मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, बीड यांचे नांवे लवकरात लवकर सादर करावी.

आदेशावरुन
19/3/2025
प्रबधक,
जिल्हा न्यायालय, बीड.

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**

१. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय,बीड यांच्या कडे जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

२. सहा. अधिक्षक, रोख वित्त व लेखा विभाग, बीड यांचे कडे नोटीस बोर्डावर डकविण्या करीता